Test Booklet Code & Serial No.
प्रश्नपत्रिका कोड व क्रमांक

**A**

# Paper-III
# EDUCATION

**Signature and Name of Invigilator**

1. (Signature) ........................................

(Name) ................................................

2. (Signature) ........................................

(Name) ................................................

Seat No. | | | | | | |

(In figures as in Admit Card)

Seat No. ............................................................
(In words)

OMR Sheet No. | | | | | | |

(To be filled by the Candidate)

## JAN - 70318

**Time Allowed : 2½ Hours]** **[Maximum Marks : 150**

Number of Pages in this Booklet : **32** Number of Questions in this Booklet : **75**

**Instructions for the Candidates**

1. Write your Seat No. and OMR Sheet No. in the space provided on the top of this page.
2. This paper consists of **75** objective type questions. Each question will carry *two* marks. *All* questions of Paper-III will be compulsory, covering entire syllabus (including all electives, without options).
3. At the commencement of examination, the question booklet will be given to the student. In the first 5 minutes, you are requested to open the booklet and compulsorily examine it as follows :
   (*i*) To have access to the Question Booklet, tear off the paper seal on the edge of this cover page. Do not accept a booklet without sticker-seal or open booklet.
   (*ii*) **Tally the number of pages and number of questions in the booklet with the information printed on the cover page. Faulty booklets due to missing pages/questions or questions repeated or not in serial order or any other discrepancy should not be accepted and correct booklet should be obtained from the invigilator within the period of 5 minutes. Afterwards, neither the Question Booklet will be replaced nor any extra time will be given. The same may please be noted.**
   (*iii*) After this verification is over, the OMR Sheet Number should be entered on this Test Booklet.
4. Each question has four alternative responses marked (A), (B), (C) and (D). You have to darken the circle as indicated below on the correct response against each item.
   **Example :** where (C) is the correct response.
   (A) (B) ● (D)
5. Your responses to the items are to be indicated in the **OMR Sheet given inside the Booklet only.** If you mark at any place other than in the circle in the OMR Sheet, it will not be evaluated.
6. Read instructions given inside carefully.
7. Rough Work is to be done at the end of this booklet.
8. If you write your Name, Seat Number, Phone Number or put any mark on any part of the OMR Sheet, except for the space allotted for the relevant entries, which may disclose your identity, or use abusive language or employ any other unfair means, you will render yourself liable to disqualification.
9. You have to return original OMR Sheet to the invigilator at the end of the examination compulsorily and must not carry it with you outside the Examination Hall. You are, however, allowed to carry the Test Booklet and duplicate copy of OMR Sheet on conclusion of examination.
10. **Use only Blue/Black Ball point pen.**
11. **Use of any calculator or log table, etc., is prohibited.**
12. **There is no negative marking for incorrect answers.**

**विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाच्या सूचना**

1. परिक्षार्थींनी आपला आसन क्रमांक या पृष्ठावरील वरच्या कोपऱ्यात लिहावा. तसेच आपणांस दिलेल्या उत्तरपत्रिकेचा क्रमांक त्याखाली लिहावा.
2. सदर प्रश्नपत्रिकेत **75** बहुपर्यायी प्रश्न आहेत. प्रत्येक प्रश्नास **दोन** गुण आहेत. या प्रश्नपत्रिकेतील **सर्व** प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे. सदरचे प्रश्न हे या विषयाच्या संपूर्ण अभ्यासक्रमावर आधारित आहेत.
3. परीक्षा सुरू झाल्यावर विद्यार्थ्याला प्रश्नपत्रिका दिली जाईल. सुरुवातीच्या 5 मिनीटांमध्ये आपण सदर प्रश्नपत्रिका उघडून खालील बाबी अवश्य तपासून पहाव्यात.
   (*i*) प्रश्नपत्रिका उघडण्यासाठी प्रश्नपत्रिकेवर लावलेले सील उघडावे. सील नसलेली किंवा सील उघडलेली प्रश्नपत्रिका स्विकारू नये.
   (*ii*) **पहिल्या पृष्ठावर नमूद केल्याप्रमाणे प्रश्नपत्रिकेची एकूण पृष्ठे तसेच प्रश्नपत्रिकेतील एकूण प्रश्नांची संख्या पडताळून पहावी. पृष्ठे कमी असलेली/कमी प्रश्न असलेली/प्रश्नांचा चूकीचा क्रम असलेली किंवा इतर त्रुटी असलेली सदोष प्रश्नपत्रिका सुरुवातीच्या 5 मिनिटातच पर्यवेक्षकाला परत देऊन दुसरी प्रश्नपत्रिका मागवून घ्यावी. त्यानंतर प्रश्नपत्रिका बदलून मिळणार नाही तसेच वेळही वाढवून मिळणार नाही याची कृपया विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.**
   (*iii*) वरीलप्रमाणे सर्व पडताळून पहिल्यानंतरच प्रश्नपत्रिकेवर ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेचा नंबर लिहावा.
4. प्रत्येक प्रश्नासाठी (A), (B), (C) आणि (D) अशी चार विकल्प उत्तरे दिली आहेत. त्यातील योग्य उत्तराचा रकाना खाली दर्शविल्याप्रमाणे ठळकपणे काळा/निळा करावा.
   **उदा. :** जर (C) हे योग्य उत्तर असेल तर.
   (A) (B) ● (D)
5. या प्रश्नपत्रिकेतील प्रश्नांची उत्तरे **ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेतच दर्शवावीत.** इतर ठिकाणी लिहिलेली उत्तरे तपासली जाणार नाहीत.
6. आत दिलेल्या सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात.
7. प्रश्नपत्रिकेच्या शेवटी जोडलेल्या कोऱ्या पानावरच कच्चे काम करावे.
8. जर आपण ओ.एम.आर. वर नमूद केलेल्या ठिकाणा व्यतिरीक्त इतर कोठेही नाव, आसन क्रमांक, फोन नंबर किंवा ओळख पटेल अशी कोणतीही खूण केलेली आढळून आल्यास अथवा असभ्य भाषेचा वापर किंवा इतर गैरमार्गाचा अवलंब केल्यास विद्यार्थ्याला परीक्षेस अपात्र ठरविण्यात येईल.
9. परीक्षा संपल्यानंतर विद्यार्थ्याने मूळ ओ.एम.आर. उत्तरपत्रिका पर्यवेक्षकांकडे परत करणे आवश्यक आहे. तथापी, प्रश्नपत्रिका व ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेची द्वितीय प्रत आपल्याबरोबर नेण्यास विद्यार्थ्यांना परवानगी आहे.
10. **फक्त निळ्या किंवा काळ्या बॉल पेनचाच वापर करावा.**
11. **कॅलक्युलेटर किंवा लॉग टेबल वापरण्यास परवानगी नाही.**
12. **चुकीच्या उत्तरासाठी गुण कपात केली जाणार नाही.**

# EDUCATION

## Paper III

# शिक्षणशास्त्र

## प्रश्नपत्रिका III

**Time Allowed : 2½ Hours]** **[Maximum Marks : 150**

**Note :** This paper contains *Seventy five* (75) multiple choice questions. Each question carrying **Two (2)** marks. Attempt *All* questions.

**सूचना :** या प्रश्नपत्रिकेत एकूण **पचहत्तर (75)** बहुपर्यायी प्रश्न दिलेले आहेत. प्रत्येक प्रश्नाला **दोन (2)** गुण आहेत. **सर्व** प्रश्न सोडवा.

1. ...................... is not a form of naturalism.

   (A) Mechanical

   (B) Scientific

   (C) Physical

   (D) Biological

1. ........................... हा निसर्गवादाचा प्रकार नाही.

   (A) यांत्रिक

   (B) वैज्ञानिक

   (C) भौतिक

   (D) जैविक

2. One who view the man as a sujbect and condemn all attempts to objectify him :

   (A) Realists

   (B) Idealists

   (C) Existentialists

   (D) Pragmatists

2. एक व्यक्ती म्हणून मनुष्याकडे पाहणारा व त्याची वस्तू बनविण्याच्या सर्व प्रयत्नांचा निषेध करतात :

   (A) वास्तववादी

   (B) आदर्शवादी

   (C) अस्तित्ववादी

   (D) उपयुक्ततावादी

3. Which school of philosophy believes in the universal mind ?

   (A) Naturalism

   (B) Pragmatism

   (C) Idealism

   (D) Realism

4. According to Sri Aurobindo by which way we achieve realization of sublime truth ?

   (A) Strict discipline

   (B) Holistic vision

   (C) Insight thinking

   (D) Yogabhyas

5. Gandhiji's curriculum is *not* related to ...................... .

   (A) Core-curriculum

   (B) Craft centred curriculum

   (C) Activity centred curriculum

   (D) Correlated curriculum

3. तत्वज्ञानाची कोणती शाखा वैश्विक मनावर विश्वास ठेवते ?

   (A) निसर्गवाद

   (B) उपयुक्ततावाद

   (C) आदर्शवाद

   (D) वास्तववाद

4. 'उच्चतम सत्याचा ज्ञान' प्राप्त करण्याचे साधन श्री अरविन्दानुसार कोणता होता ?

   (A) कड़क शिस्त

   (B) समग्र जीवनदृष्टी

   (C) गंभीर चिंतन

   (D) योगाभ्यास

5. .......................... गांधीजींच्या अभ्यासक्रमाशी संबंधित **नाही**.

   (A) गाभाभूत अभ्यासक्रम

   (B) उद्योगकेंद्रित अभ्यासक्रम

   (C) कृतिकेंद्रित अभ्यासक्रम

   (D) सह-संबंधित अभ्यासक्रम

6. What does social-change mean ?
   (A) Social mobility
   (B) Change in education system
   (C) Change in government
   (D) Social progress

7. Equal educational opportunity is a principle derived from .......... .
   (A) Educational sociology
   (B) Sociology of education
   (C) Economics of education
   (D) History of education

8. Stratification in society is based on ......................... .
   (A) Power, property and prestige
   (B) Culture, caste and class
   (C) Education earning and empowerment
   (D) Motivation, mobility and material

6. सामाजिक परिवर्तनाचा अर्थ ...................... .
   (A) सामाजिक गतिशीलता
   (B) शिक्षण-प्रणालीत बदल
   (C) शासनात बदल
   (D) सामाजिक विकास

7. शैक्षणिक संधीच्या समानतेचा सिद्धांत ......... .................... यातून घेतलेला आहे.
   (A) शैक्षणिक समाजशास्त्र
   (B) शिक्षणाचे समाजशास्त्र
   (C) शिक्षणाचे अर्थशास्त्र
   (D) शिक्षणाचा इतिहास

8. समाजाच्या स्तरीकरणाचा आधार ................ आहे.
   (A) सत्ता, संपत्ती आणि गौरव
   (B) संस्कृती, जाती आणि वर्ग
   (C) शिक्षण अर्थार्जन आणि सशक्तीकरण
   (D) अभिप्रेरण, गतिशीलता आणि भौतिक संपन्नता

9. The movement from one social class to another is known as ................ .

(A) Social status

(B) Social control

(C) Social change

(D) Social mobility

10. The community influences the ...................... .

(A) Education curriculum of the school

(B) Educational objectives of the school

(C) Educational practices of the school

(D) All of the above

11. According to Piaget's developmental theory, in ....................... stage child can learns that symbols represent something else.

(A) Sensori-motor

(B) Pre-operational

(C) Concrete operational

(D) Formal operational

9. एका सामाजिक वर्गातून दुसऱ्या वर्गाकडे जाण्याच्या प्रक्रियेला .......................... म्हणतात.

(A) सामाजिक स्थिती

(B) सामाजिक नियंत्रण

(C) सामाजिक परिवर्तन

(D) सामाजिक गतिशीलता

10. समुदायाचा प्रभाव खालीलपैकी कशावर पडतो ?

(A) शाळेच्या शैक्षणिक अभ्यासक्रमावर

(B) शाळेच्या शैक्षणिक उद्दिष्टावर

(C) शालेय शिक्षण प्रणालीवर

(D) वरीलपैकी सर्वावर

11. पियाजेच्या बोधात्मक विकास उपपत्तीनुसार मुलं .......................... या अवस्थेत चिन्हांचा अर्थ समजून घेते.

(A) संवेदनकारक

(B) क्रियापूर्व

(C) मूर्त क्रियात्मक

(D) अमूर्त क्रियात्मक

12. ........................... is *not* a characteristic of growth and development.

(A) Principle of continuity

(B) Principle of motivation

(C) Principle of integration

(D) Principle of interrelation

13. .................... is higher type of thinking process.

(A) Problem solving

(B) Critical thinking

(C) Reasoning

(D) Reflective thinking

14. ............................ spent a number of years in counting the words which were used in popular magazines, children's books etc.

(A) E.I. Thorndike and I. Lorge

(B) E.I. Thorndike and Pavlov

(C) E.I. Thorndike and Skinner

(D) E.I. Thorndike and M. Lord

12. वाढ व विकासाचे ........................... हे तत्त्व **नाही**.

(A) सातत्य तत्त्व

(B) प्रेरणेचे तत्त्व

(C) एकात्मतेचे तत्त्व

(D) परस्परसंबंधाचे तत्त्व

13. ........................... ही उच्च प्रकारची विचार प्रक्रिया आहे.

(A) समस्या विमोचन

(B) चिकित्सक विचार

(C) तर्क किंवा अनुमान

(D) विमर्शी चिंतन

14. प्रसिद्ध मासिके, मुलांची पुस्तके इ. मध्ये कोणत्या शब्दांचा जास्त वापर होतो, हे मोजण्यासाठी ........................... यांनी बरीच वर्षे काम केले.

(A) इ. आय. थॉर्नडाईक व आय. लॉर्ज

(B) इ. आय. थॉर्नडाईक व पॉव्हलॉव्ह

(C) इ. आय. थॉर्नडाईक व स्किनर

(D) इ. आय. थॉर्नडाईक व एम. लॉर्ड

15. The children of heighted parents will tend to be average height. This statement is related to law of ...................... of heredity.
    (A) Similarity
    (B) Variation
    (C) Regression
    (D) Contrast

15. उंच आईवडिलांच्या मुलांची उंची सरासरीकडे झुकलेली आढळते. हे विधान अनुवंशासंबंधीच्या .......................... नियमाशी निगडित आहे.
    (A) साधर्म्याच्या
    (B) वैविध्याच्या
    (C) परागतीच्या
    (D) विरोधाच्या

16. ........................ primary mental ability is not included in Thurstone's multifactor intelligence theory.
    (A) Verbal
    (B) Perceptual
    (C) Musical
    (D) Spatial

16. थर्स्टनच्या बहुघटक बुद्धिमत्ता उपपत्तीमध्ये .......................... ही प्राथमिक मानसिक क्षमता समाविष्ट नसते.
    (A) भाषिक
    (B) अवबोध
    (C) संगीत
    (D) अवकाश संवेदन

17. Suraj is trying to solve the mathematical example but he can't solve it. Suddenly he get clue and solve the example. This is .................. type of learning.
    (A) Logical
    (B) Insight
    (C) Discovery
    (D) Co-operative

17. सूरज गणितातील उदाहरण सोडवण्याचा प्रयत्न करतोय परन्तू सोडवू शकत नाही. अचानक त्याला सूचक प्राप्त होते व तो उदाहरण सोडवतो. हे .......................... प्रकारचे अध्ययन आहे.
    (A) तार्किक
    (B) मर्मदृष्टी
    (C) शोधन
    (D) सहकार्यात्मक

18. The new concept of latent learning was propagated by ...................... in his learning theory.
   (A) Tolman
   (B) Skinner
   (C) Thorndike
   (D) Hull

19. The greatest contribution of Hull's theory is ...................... .
   (A) Strength of the drive
   (B) Habit strength
   (C) Linking the learning to the needs of the children
   (D) The incentive motivation

20. Priya apply the values taught in a classroom at daily life purposely and faithfully. This behaviour is related to ......................theory of transfer of learning.
   (A) Thorndike's
   (B) Judd's
   (C) Bagley's
   (D) Locke's

18. सुप्त अध्ययनाची नवीन संकल्पना .............. यांनी त्यांच्या अध्ययन उपपत्तीत मांडली.
   (A) टॉलमन
   (B) स्किनर
   (C) थॉर्नडाईक
   (D) हल्ल

19. हल्ल यांच्या उपपत्तीचे मोठे योगदान हे .......................... आहे.
   (A) प्रेरकशक्तीची ताकद
   (B) सवयीचे दाढर्य
   (C) मुलांच्या गरजांशी अध्ययनास जोडणे
   (D) आमिषाचे प्रेरण

20. प्रिया वर्गात शिकवलेल्या मूल्यांचा हेतुपूर्वक व निष्ठेने दैनंदिन जीवनात वापर करते. हे तिचे वर्तन .......................... अध्ययन संक्रमण उपपत्तीशी संबंधित आहे.
   (A) थॉर्नडाईकच्या
   (B) जड्डच्या
   (C) बॅग्लेच्या
   (D) लॉकच्या

21. In personality theory, .................. classifed all human being into certain biological types according to their physical structure.

(A) Kretschmer

(B) Sheldon

(C) Jung

(D) Allport

22. Every personality is the end-product of this process of ....................... .

(A) Learning and motivation

(B) Learning and acquisition

(C) Heredity and motivation

(D) Environment and motivation

23. According to Cattell, curiosity and dependability are the examples of .................... type of trait.

(A) Common

(B) Unique

(C) Surface

(D) Source

21. व्यक्तिमत्त्व उपपत्तीमध्ये ........................... यांनी व्यक्तीचा शरीरबांधा यानुसार विशिष्ट जैविक वर्गप्रकारात वर्गीकरण केले.

(A) क्रेश्मर

(B) शेल्डन

(C) युंग

(D) ऑलपोर्ट

22. प्रत्येक व्यक्तिमत्त्व हे शेवटी ..................... 'प्रक्रियेचे उत्पादन आहे.

(A) अध्ययन व प्रेरणा

(B) अध्ययन व संपादन

(C) अनुवंश व प्रेरणा

(D) वातावरण व प्रेरणा

23. कॅटल यांच्या मते, कुतूहल व अवलंबित्व हे ......................... प्रकारच्या गुणतत्त्वाचे उदाहरण आहे.

(A) सामान्य

(B) अनन्यसाधारण

(C) पृष्ठीय

(D) स्रोत

24. .......................... psychologist stated that 'Mental hygiene is a science'.

(A) Crow and Crow

(B) Drever

(C) D.B. Klein

(D) Shaffer

25. Rahul always says to his friend that he is intimately acquainted with the district education officers. Here .................. defence mechanism was used by Rahul.

(A) Delusion

(B) Rationalization

(C) Projection

(D) Identification

26. There is no freedom to the individual in ........................ type of counselling.

(A) Direct counselling

(B) Non-directive counselling

(C) Group counselling

(D) Individual counselling

24. 'मानसिक स्वास्थ्य हे विज्ञान आहे' असे .......................... मानसशास्त्रज्ञाने म्हटले आहे.

(A) क्रो आणि क्रो

(B) ड्रीव्हर

(C) डी.बी. किन

(D) शेफर

25. जिल्हा शिक्षणाधिकाऱ्यांशी माझी चांगली ओळख आहे असे राहुल आपल्या मित्राला सतत भासवित असतो. येथे राहुल ने .......................... संरक्षण यंत्रणेचा उपयोग केला.

(A) विकृत श्रद्धा

(B) समर्थन

(C) प्रक्षेपण

(D) तादात्म

26. खालीलपैकी .......................... या समुपदेशन प्रकारात व्यक्तीला स्वातंत्र्य नसते.

(A) प्रत्यक्ष समुपदेशन

(B) अदिशादर्शक समुपदेशन

(C) समूह समुपदेशन

(D) वैयक्तिक समुपदेशन

27. Achivement test is given to a class. This step is useful for guidance of ......................... .

(A) Slow learners

(B) Backward class learners

(C) Gifted children

(D) Problem children

28. Neha got less marks than her expectations in the S.S.C. examination. "She states that this is because the examiners did not check the papers properly". This is an example of ..................... Defence Mechanism.

(A) Projection

(B) Negativism

(C) Suppression

(D) Rationalization

27. 'सर्व वर्गाला संपादन चाचणी देणे' या पायरीचा उपयोग खालील ......................... मार्गदर्शनासाठी केला जातो.

(A) मंदगती बालकांच्या

(B) मागास बालकांच्या

(C) प्रज्ञावंत बालकांच्या

(D) समस्या प्रधान बालकांच्या

28. S.S.C. परीक्षेत नेहाला अपेक्षेपेक्षा खूप कमी गुण मिळाले त्याचे कारण परीक्षकांनी पेपर्स चांगले तपासले नाही असे तिचे म्हणणे आहे. तिचे असे सांगणे म्हणजेच संरक्षण यंत्रणेचा ............... प्रकार होय.

(A) प्रक्षेपण तंत्र

(B) नकारात्मकता

(C) निरोधन

(D) समर्थन

29. Cumulative record is a .................. tool of guidance.
    (A) Non-standardized
    (B) Standardized
    (C) Objective
    (D) Appropriate

30. The selection of an appropriate person in an appropriate place is called ...................... .
    (A) Placement
    (B) Follow-up
    (C) Guidance
    (D) Counselling

31. Researchers use non-probabilistic sample because ...................... .
    (A) Probabilistic sampling is costly
    (B) It is a simple and quick method
    (C) It provides freedom for continuous representative selection
    (D) Many a time basic data necessary for probabilistic sample is not available

29. संकलित नोंदपत्रिका हे मार्गदर्शनाचे ........... साधन आहे.
    (A) अप्रमाणित
    (B) प्रमाणित
    (C) वस्तुनिष्ठ
    (D) योग्य

30. योग्य व्यक्तिची योग्य ठिकाणी निवड होणे यास .......................... म्हणतात.
    (A) स्थापनाकार्य
    (B) अनुधावन
    (C) मार्गदर्शन
    (D) समुपदेशन

31. संशोधक असंभाव्यता आधारित नमुना वापरतात कारण .......................... .
    (A) संभाव्यता आधारित नमुनानिवड महाग असते
    (B) ती सोपी व लवकर होणारी पद्धत आहे
    (C) या पद्धतीत अखंडित प्रातिनिधिक निवडीचे स्वातंत्र्य मिलते
    (D) अनेक वेळा संभाव्यता आधारित नमुन्यासाठीची मूलभूत माहिती (data) उपलब्ध नसते.

32. Probability of selection of a unit to the sample is :

(A) $\frac{\text{Sample size}}{\text{Population size}}$

(B) $\frac{\text{Population size}}{\text{Sample size}}$

(C) $\frac{\text{Population size} + \text{Sample size}}{\text{Population size}}$

(D) $\frac{\text{Population size}}{\text{Population size} + \text{Sample size}}$

33. Sampling interval for systematic sampling is calculated by the formula :

(A) $\frac{\text{Poputlation size}}{\text{Desired sample size}}$

(B) $\frac{\text{Sample size}}{\text{Population size}}$

(C) $\frac{\text{Population size} - \text{Sample size}}{2}$

(D) $\frac{\text{Population size} + \text{Sample size}}{2}$

32. एखाद्या घटकाला (unit) नमुन्यामध्ये निवडले जाण्याची संभाव्यता म्हणजे ........................ .

(A) $\frac{\text{नमुना आकार}}{\text{जनसंख्या आकार}}$

(B) $\frac{\text{जनसंख्या आकार}}{\text{नमुना आकार}}$

(C) $\frac{\text{जनसंख्या आकार} + \text{नमुना आकार}}{\text{जनसंख्या आकार}}$

(D) $\frac{\text{जनसंख्या आकार}}{\text{जनसंख्या आकार} + \text{नमुना आकार}}$

33. नियमबद्ध नमुनानिवड पद्धतीमध्ये नमुनानिवड अन्तर (sampling interval) चे गणन .......................... सूत्राने केले जाते.

(A) $\frac{\text{जनसंख्या आकार}}{\text{इच्छित नमुना आकार}}$

(B) $\frac{\text{नमुना आकार}}{\text{जनसंख्या आकार}}$

(C) $\frac{\text{जनसंख्या आकार} - \text{नमुना आकार}}{2}$

(D) $\frac{\text{जनसंख्या आकार} + \text{नमुना आकार}}{2}$

34. Which of the following does *not* belong to random sampling technique ?

(A) Systematic sampling

(B) Cluster sampling

(C) Proportional stratified sampling

(D) Purposive sampling

35. Of late 'random number tables' are not in use for sample selection because :

(A) It is difficult to compute with tables

(B) Non-availability of tables

(C) It is easy to do with computers

(D) Tables do not provide accurate numbers

34. खालीलपैकी काय यादृच्छिक नमुनानिवड तंत्रामध्ये येत **नाही** ?

(A) नियमबद्ध नमुनानिवड

(B) गुच्छ नमुनानिवड

(C) प्रमाणबद्ध स्तरीकृत नमुनानिवड

(D) सहेतुक नमुनानिवड

35. हल्लीच्या काळात नमुना निवडण्यासाठी 'यादृच्छिक क्रमांक सारण्या' वापरल्या जात नाहीत कारण :

(A) सारण्यांच्या साहाय्याने गणन करणे कठीण असते

(B) सारण्या उपलब्ध होत नाहीत

(C) संगणकाच्या साहाय्याने ते करणे सोपे जाते

(D) सारण्यांमध्ये अचूक क्रमांक मिळत नाहीत

36. Three researchers collected data using same objectives, design and tool but with independently selected sample units from same target population. The comprehensive report of three researchers is called :

(A) Team work

(B) Cross-sectional study

(C) Cohort study

(D) Collective study

37. Major drawback of mailed questionnaire survey is :

(A) Time consumption in collecting data

(B) No response from sample unit

(C) Illegible handwriting in questionnaire

(D) Authenticity of data

36. तीन संशोधकांनी सारखीच उद्दिष्टे, आराखडा आणि साधन वापरून माहिती (data) संकलित केली. मात्र हे करताना त्यांनी एकाच लक्ष्य जनसंख्येतून स्वतंत्रपणे नमुने निवडले होते. त्या तीन संशोधकांच्या समग्र अहवालास ........... म्हणतात.

(A) समूहकार्य

(B) तिर्यक छेदात्मक अभ्यास

(C) कोहोर्ट स्टडी (लहान गटांवरील अभ्यास)

(D) संकलन अभ्यास

37. पोस्टाद्वारे प्रश्नावली पाठवून केलेल्या सर्व्हेक्षणाची प्रमुख कमतरता '....................' ही होय.

(A) माहिती संकलनातील वेळेचा व्यय

(B) नमुना एककांकडून प्रतिसाद न मिळणे

(C) प्रश्नावलीतील अवाच्य/गिचमीड हस्ताक्षर

(D) माहितीचा सत्यता

38. The research studies of .................. approach do not use inferential statistics to test hypotheses about a larger population of interest.

(A) Associational research

(B) Non-experimental

(C) Experimental

(D) Descriptive

39. Which one of the following is *not* the characteristic of historical research ?

(A) It is not completely objective

(B) Purpose is to understand sequence of events and to reason out

(C) Providing meaning to events

(D) Validate assumptions with representative data

40. If the research problem requires to ........................, one needs to undertake quantitative research.

(A) Learn about views of individuals

(B) Assess a process overtime

(C) Obtain detailed information about few people

(D) Measure variables

38. संशोधनाच्या ........................ उपागमामध्ये, निश्चित केलेल्या मोठ्या जनसंख्येबाबतच्या परिकल्पनांचे परीक्षण करण्यासाठी अनुमानात्मक सांख्यिकीचा उपयोग केला जात नाही.

(A) संबंधात्मक संशोधन

(B) अ-प्रायोगिक

(C) प्रायोगिक

(D) वर्णनात्मक

39. खालीलपैकी कोणते ऐतिहासिक संशोधनाचे वैशिष्ट्य **नाही** ?

(A) ते पूर्णपणे वस्तुनिष्ठ नसते

(B) घटनांचा क्रम समजून घेणे व त्यांची कारणे शोधणे हा हेतू असतो

(C) घटनांना अर्थ प्राप्त करून देणे

(D) गृहीतकांना (asumptions) प्रातिनिधिक माहितीच्या (data) सहाय्याने वैध ठरविणे

40. जर संशोधन समस्येबाबत '........................' आवश्यक असेल तर संख्यात्मक संशोधन हाती घेणे आवश्यक असते.

(A) व्यक्तींच्या मतांबाबत अभ्यास करणे

(B) काही कालावधीसाठी प्रक्रियांचे मूल्यांकन करणे

(C) कांही व्यक्तींबाबत सखोल माहिती (information) प्राप्त करणे

(D) चलांचे मापन करणे

41. Vocationalization of education was first recommended by ............in India.

(A) Hunter Commission

(B) Seargent Commission

(C) Radhakrishnan Commission

(D) Kothari Commission

42. Indian education requires rapid vocational expansion to ................ .

(A) Reduce enrolment in general education system

(B) Reduce importance of white collared jobs

(C) Provide skilled manpower

(D) Provide cheap labour to industry

41. भारतात शिक्षणाच्या व्यावसायिकीकरणाची पहिल्यांदा शिफारस ........................ यांनी केली.

(A) हंटर कमिशन

(B) सर्जन कमिशन

(C) राधाकृष्ण कमिशन

(D) कोठारी कमिशन

42. भारतीय शिक्षणाला गतिमान व्यवसायीकरणाच्या विस्ताराची ........................ यासाठी गरज आहे.

(A) सामान्य शिक्षणातील विद्यार्थी संख्या कमी करणे

(B) पांढरपेशे व्यवसायांचे महत्त्व कमी करणे

(C) कुशल मनुष्यबळ पुरविणे

(D) उद्योगाला स्वस्त कामगार पुरविणे

43. MHRD, India has proposed as a policy to ...................... .

(A) encourage degree colleges to integrate vocational course as option

(B) start independent vocational courses

(C) confine vocationalization at +2 level

(D) introduce vocational course in every degree course

44. The 'Equivalency Theory' of distance education is given by ................... .

(A) Keegan

(B) Holmberg

(C) Moore

(D) Peters

45. From the following which is *not* an important feature of Distance Education System ?

(A) Study material

(B) Electronic media

(C) Assignments

(D) Classrooms

43. भारताच्या मनुष्यबळ विकास विभागाने ......................... हे धोरण प्रस्तावित केले आहे.

(A) पदवी महाविद्यालयांना व्यावसायिक कोर्सचे एकात्मीकरण करण्यासाठी प्रोत्साहित करणे

(B) स्वतंत्र व्यावसायिक कोर्सेस सुरू करणे

(C) +2 स्तरापर्यंत व्यावसायिकीकरण मर्यादित करणे

(D) प्रत्येक महाविद्यालयामध्ये व्यावसायिक कोर्सेस सुरू करणे

44. दूरशिक्षणाची समतुल्य उपपत्ती .................... यांनी मांडली आहे.

(A) कीगन

(B) होल्मबर्ग

(C) मूर

(D) पीटर्स

45. खालीलपैकी दूरशिक्षणाचे ......................... हे वैशिष्ट्य **नाही**.

(A) अध्ययन साहित्य

(B) इलेक्ट्रॉनिक माध्यम

(C) स्वाध्याय

(D) वर्गखोल्या

46. According to Ralph Taylor (1949), major steps of curriculum development are :

(A) Objectives – learning experience – organization – evaluation – outcomes

(B) Educational purpose – teaching methods – course outline – evaluation

(C) Objectives – syllabus – teaching-learning – examination

(D) Objectives – content – teaching – evaluation

47. Which one of the following is *not* the external criteria for curriculum evaluation ?

(A) Placement and admission demand

(B) Job satisfaction and employer's satisfaction

(C) Employer's satisfaction and placement

(D) Expert opinion and institutional infrastructure

46. राल्फ टेलर (1949) च्या म्हणण्यानुसार अभ्यासक्रमाच्या पुढील पायऱ्या आहेत.

(A) उद्दिष्टे – अध्ययन अनुभव – संघटन – मूल्यमापन – निष्पत्ती

(B) शिक्षणाचा हेतू – अध्यापनपद्धती – अभ्यासक्रम आराखडा – मूल्यमापन

(C) उद्दिष्टे – पाठ्यक्रम – अध्यापन-अध्ययन – परीक्षा

(D) उद्दिष्टे – आशय – अध्यापन – मूल्यमापन

47. खालीलपैकी कोणती बाब अभ्यासक्रमाच्या बाह्य मूल्यमापनाचा निकाय **नाही** ?

(A) पदनिश्चिती व प्रवेश मागणी

(B) व्यवसाय समाधान व नोकरी देणाऱ्या व्यक्तीचे (employer) समाधान

(C) नोकरी देणाऱ्या व्यक्तीचे समाधान व पदनिश्चिती

(D) तज्ञाचे मत व संस्थात्मक पायाभूत सुविधा

48. Scriven's formative model (1967) of curricular evaluation does *not* advocate :

(A) Field traits of course materials

(B) Interacting with learner together

(C) Gather opinions by external group on course development

(D) Pre-product evaluation to meet the curricular goals

49. Choice based credit system curriculum provides scope for :

(A) Analyse theory practicals separately and evaluate

(B) Integrate theory and practicum as a unit of valuation

(C) Provide more importance to practicals and less to theory component

(D) Provide more importance to the theoretical component than practical

48. स्क्रिवेनच्या अभ्यासक्रम मूल्यमापनाच्या विकासात्मक प्रतिमान पुढील बाबीचा पुरस्कार करीत **नाही** :

(A) अभ्यासक्रम साहित्याचे क्षेत्रीय गुण

(B) विद्यार्थ्यांशी आंतरक्रिया

(C) अभ्यासक्रम विकसनासाठी बाह्य समूहाकडून मते मागविणे

(D) अभ्सासक्रम ध्येये गाढण्यासाठी पूर्व फलित मूल्यमापन

49. अभ्यासक्रमाच्या निवड आधारित श्रेयांक प्रणाली–मध्ये .............................. साठी खूप वाव दिलेला आहे.

(A) तात्त्विक व प्रात्यक्षिकाचे स्वतंत्रपणे विश्लेषण व मूल्यमापन

(B) तात्त्विक व प्रात्यक्षिकाचे एकात्मीकरण एकाच घटकात असावे

(C) प्रात्यक्षिकाला अधिक महत्त्व व तात्त्विकाला कमी महत्त्व

(D) तात्त्विकाला अधिक महत्त्व व प्रात्यक्षिकाला कमी महत्त्व

50. Which one is *not* the component of the curriculum ?

(A) Design

(B) Evaluation

(C) Teaching-learning experiences

(D) Abilities

51. From the following .................... is not a principle of good supervision.

(A) respect individuality of teacher

(B) hold back praise of teacher

(C) not confine to four walls of the school

(D) impartial observation of facts

52. The basic purpose of supervision is ....................... .

(A) Organize the working of school

(B) Operate the school

(C) Improvement in the working of school

(D) Direct the working of the school

50. खालीलपैकी, अभ्यासक्रमाच्या कोणता घटक **नाही** ?

(A) आराखडा

(B) मूल्यमापन

(C) अध्यापन-अध्ययन अनुभव

(D) क्षमता

51. खालीलपैकी .............................. हे चांगल्या पर्यवेक्षणाचे तत्त्व नाही.

(A) शिक्षकाच्या वैयक्तिकेतचा आदर करतो

(B) शिक्षकाची स्तुती करत नाही

(C) शाळेच्या चार भिंतीमधे बंदिस्त नसते

(D) तथ्यांचे निरपेक्ष निरीक्षण करतो

52. पर्यवेक्षणाचा प्रमुख हेतू ............................ .

(A) शाळेचा कामकाजाचे संघटन

(B) शाळा चालविणे

(C) शालेय कामकाजात सुधारणा

(D) शालेय कामकाजाला दिशादर्शन

53. Leaders who are generally indifferent to the organization and work are called ........................ .

(A) Autocrat

(B) Deserter

(C) Compromiser

(D) Missionary

54. From the following ................... is not a feature of administration.

(A) Plan

(B) Stimulate

(C) Diagnose

(D) Inspect

55. Decision-making is a step in ........................ .

(A) Planning

(B) Organizing

(C) Evaluating

(D) Executing

53. जे नेते संघटनेपासून व कार्यापासून अलिप्त राहतात त्यांना .............................. असे म्हणतात.

(A) अधिकारवादी/स्वेच्छाधारी

(B) पलायनवादी

(C) तलजोडवादी

(D) सेवाभावी

54. खालीलपैकी .......... हे प्रशासनाचे वैशिष्ट्य नाही.

(A) नियोजन

(B) उत्तेजन

(C) निदान

(D) तपासणी

55. निर्णय प्रक्रिया ही .............................. मधील पायरी आहे.

(A) नियोजन

(B) संघटन

(C) मूल्यमापन

(D) कार्यवाही

56. Any teacher wants to evaluate his students, then evaluation process starts from ......................... .

(A) Fix the teaching objectives

(B) Select the evaluation tool

(C) Fix the evaluation questions

(D) Fix the type of questions for evaluation

57. ....................... criteria is observed more in the test in which objective questions are included.

(A) Validity

(B) Reliability

(C) Adequacy

(D) Utility

58. If an attitude scale development is characterised by simple procedure, involves less time and work, yet provide good reliability, the method will be .................... .

(A) Thurstone's method of paired comparison

(B) Thurstone and Chave's method of equal appearing intervals

(C) Likert's method of summated rating

(D) Gutman's scalogram method

56. एखाद्या शिक्षकाला विद्यार्थ्यांचे मूल्यमापन करावयाचे असल्यास त्याच्या मूल्यमापन प्रक्रियेची सूरूवात ही .............................. पासून होते.

(A) अध्यापनाची उद्दिष्टे ठरविण्या

(B) मूल्यमापन साधन निवडण्या

(C) मूल्यमापन प्रश्न ठरविण्या

(D) मूल्यमापनाचे प्रश्न प्रकार ठरविण्या

57. वस्तुनिष्ठ प्रश्न समाविष्ट असणाऱ्या चाचणीमध्ये .............................. हा निकष अधिक दिसून येतो.

(A) सप्रमाणता

(B) विश्वसनीयता

(C) पर्याप्तता

(D) उपयुक्तता

58. एखाद्या व्यक्तीचे अभिवृत्ती मापन करण्यासाठी वापरात येणाऱ्या पद्धतीची गुणवैशिष्ठ्ये ही उपयोजनास सोपी असणे, वेळ व श्रम कमी लागणे आणि अधिक विश्वसनीय असणे हे आहेत. तर ती .............................. अभिवृत्ती मापन पद्धती आहे.

(A) थर्स्टनची युग्म तुलना

(B) थर्स्टन व चेव्हची समदर्शनी अंतर

(C) लिकर्टची योग निर्धारण

(D) गटमनची स्केलोग्राम

59. Sandeep use psychological test for his research. The interpretation process of test was so difficult that's why he faced problems. This experience of Sandeep about test because of ..................... criterion weakness.

(A) Discrimination power

(B) Adequacy

(C) Usability

(D) Validity

60. Interchange the questions in between two tests prepared by Anil. Then their is no change in the nature of two tests. So .................. method was used by Anil for testing of reliability of the tests.

(A) Test-retest

(B) Parallel forms

(C) Split half

(D) Rational-equivalence

59. संदिपने संशोधन करण्यासाठी मानसशास्त्रीय चाचणीचा वापर केला. चाचणीचे अर्थनिर्वचन प्रक्रिया अत्यंत कठिण असल्याने त्यास समस्यांना सामोरे जावे लागले. हा अनुभव संदिपला चाचणीच्या .............................. निकषच्या कमतरतेमुळे आला.

(A) भेदभाव-क्षमता

(B) पर्याप्तता

(C) उपयुक्तता

(D) सप्रमाणता

60. अनिलने तयार केलेल्या दोन चाचण्यांमधील प्रश्नांची अदलाबदल केली. तरी दोन्ही चाचण्यांच्या स्वरूपात कोणताही फरक पडला नाही. अनिलने या चाचण्यांची विश्वसनीयता पाहण्यासाठी .............................. पद्धतीचा वापर केला.

(A) पुनर्चाचणी

(B) समांतर चाचणी

(C) द्विभाजन

(D) सतर्क समानता

61. Study of various teaching aids which we use in teaching and learning for its effectiveness is called .......................... .

(A) Educational technology

(B) Technology of education

(C) Technology in education

(D) Instructional technology

62. The *correct* sequence in system approach in school education is as follows :

(A) Input – process – diagnostic test – feedback – output

(B) Input – diagnostic test – process – feedback – output

(C) Input – counselling – process – testing – output

(D) Input – process – counselling – feedback – output

61. विविध शैक्षणिक साधनांचा अभ्यास की जो आपण अध्ययन-अध्यापन प्रभावी होण्यासाठी वापरतो त्यास ............................ असे म्हणतात.

(A) शैक्षणिक तंत्रविज्ञान

(B) शिक्षणाचे तंत्रविज्ञान

(C) शिक्षणातील तंत्रविज्ञान

(D) अनुदेशन तंत्रविज्ञान

62. शालेय शिक्षणामधील प्रणाली उपागमामध्ये .............................. हा योग्य क्रम होय.

(A) अंतर्गमन — प्रक्रिया — नैदानिक कसोटी — प्रत्याभरण — बहिर्गमन

(B) अंतर्गमन — नैदानिक कसोटी — प्रक्रिया — प्रत्याभरण — बहिर्गमन

(C) अंतर्गमन — समुपदेशन — प्रक्रिया — चाचणी — बहिर्गमन

(D) अंतर्गमन — प्रक्रिया — समुपदेशन — प्रत्याभरण — बहिर्गमन

63. 'Common field of experiences of sender and receiver is communication.' This definition of communication is given by .................... .

(A) Shanon and Weaver

(B) Schramm

(C) Newcomb

(D) Miller

64. If we want to see the eligibility of the candidate for specific job, then we have to use ......................... test.

(A) Criterion-referenced

(B) Norm-referenced

(C) Achievement

(D) Diagnostic

65. Programmed learning is based on ...................... theory of learning.

(A) Pavlov's

(B) Hull's

(C) Thorndike's

(D) Skinner's

63. 'प्रेषक व ग्राहक यांच्या अनुभवांचे सामाईक क्षेत्र म्हणजे संप्रेषण.' ही व्याख्या .............................. ने केलेली आहे.

(A) शॅनन व व्हीवर

(B) श्रॅम

(C) न्यूकोंब

(D) मिलर

64. जर आपणास एखाद्या उमेदवाराची विशिष्ट कामासाठी पात्रता तपासून पहायची असेल तर आपणास ............................. कसोटीचा उपयोग करावा लागेल.

(A) निकष संदर्भीय

(B) प्रमापक संदर्भीय

(C) संपादन

(D) नैदानिक

65. अभिक्रमित अध्ययन .............................. च्या अध्ययन उपपत्तीवर आधारलेले आहे.

(A) पाव्हलॉव्ह

(B) हल्ल

(C) थॉर्नडाईक

(D) स्किनर

66. Nikhil wanders aimlessly in the classroom. Nikhil may be ........................ .

(A) Learning disabled

(B) Mentally retarded

(C) Hyperactive

(D) Inattentive

67. Vrunda unnecessarily speaks very fast. The reason is that she has ................. problem.

(A) hearing

(B) speaking

(C) learning disability

(D) mental retardedness

68. The method of using 'hand movements' for explaining verbal concepts to the hearing impaired students is called ....................... .

(A) Finger spell

(B) Cued speech method

(C) Action method

(D) Complete communication method

66. निखिल वर्गामध्ये विनाकारण इकडेतिकडे फिरत असतो. निखिल कदाचित ........................ असेल.

(A) अध्ययन अकार्यक्षम

(B) मतिमंद

(C) अतिचंचल

(D) अनावधानी

67. वृंदा बोलताना अकारण घाई करते याचे कारण तिच्यामध्ये .............................. हा दोष आहे.

(A) श्रवणदोष

(B) वाचादोष

(C) अध्ययन अकार्यक्षम

(D) मतिमंदत्त्व

68. कर्णबधिर विद्यार्थ्यांच्या शाब्दिक संकल्पना स्पष्ट करण्यासाठी हातवारे वापरण्याच्या पद्धतीला .............................. असे म्हणतात.

(A) करपल्लवी पद्धत

(B) क्युडस्पीच पद्धत

(C) खुणांची पद्धत

(D) संपूर्ण संपर्क पद्धत

69. The prominent feature of a five years old child whose IQ is less than 24 is being ..................... .

(A) entirely dependent on others for movement

(B) able to understand what is told by others

(C) able to adjust socially

(D) entirely independent in reading

70. The behaviour asking questions continuously is primararily seen in .................... students.

(A) mentally retarded

(B) visually impaired

(C) gifted

(D) learning disabled

69. पाच वर्षांच्या मुलाचा बुद्ध्यांक 24 पेक्षा कमी आहे त्याचे वर्तन खालील .........................

'या गटात येते.

(A) हालचालींसाठी पूर्णपणे दुसऱ्यांवर अवलंबून

(B) दुसऱ्यांनी सांगितलेले समजते

(C) सामाजिक समायोजन करता येते

(D) वाचनामध्ये पूर्णपणे स्वावलंबी

70. 'सतत प्रश्न विचारणे' हे वर्तन प्रामुख्याने ............................... या विद्यार्थ्यांमध्ये दिसून येते.

(A) मतिमंद

(B) दृष्टिदोष असणाऱ्या

(C) प्रतिभावंत

(D) अध्ययन अकार्यक्षम

71. Which of the following is *not* true aim of refresher course ?

(A) To give information about teaching profession

(B) To introduce new ideas

(C) To introduce new methods and techniques of teaching

(D) To update the knowledge

72. ..................... should be used for admission of teacher education courses.

(A) Interest inventory

(B) Intelligence test

(C) Aptitude test

(D) Achievement test

73. Which of the following is *not* the device for modification of teacher behaviour ?

(A) Simulated social skill teaching

(B) Micro-teaching

(C) Interaction analysis

(D) Character development

71. पुढीलपैकी कोणते उजळणी वर्गाचे ध्येय **नाही** ?

(A) शिक्षकी व्यवसायाबद्‌दल माहिती देणे

(B) नवीन कल्पनांची ओळख करून देणे

(C) नवीन अध्यापन पद्धती व तंत्रे यांची ओळख करून देणे

(D) ज्ञान अद्यायावत करणे

72. अध्यापक शिक्षण अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी .............................. उपयोग करावा.

(A) अभिरुची शोधिकेचा

(B) बुद्धिमापन कसोटीचा

(C) अभियोग्यता कसोटीचा

(D) संपादन कसोटीचा

73. पुढीलपैकी कोणते शिक्षक वर्तन परिवर्तनाचे साधन **नाही** ?

(A) आभासी सामाजिक कौशल्ये अध्यापन

(B) सूक्ष्म अध्यापन

(C) आंतरक्रिया विश्लेषण

(D) चारित्र्य विकसन

74. 'There should be an independent channel on television exclusively for education.' This recommendation was given by ......................... .

(A) Ram Murti Committee

(B) National Education Policy (1986)

(C) National Curriculum Framework-2005

(D) National Curriculum Framework for Teacher Education-2009

75. In Flander's observation matrix when we observe more tallies in (1, 1), (2, 2) ............ (10, 10) cells. This shows ................... .

(A) Teacher's continuous activity

(B) Students continuons activity

(C) Silence in the class

(D) Noise in the class

74. 'केवळ शिक्षणासाठी दूरदर्शनवर एक स्वतंत्र वाहिनी असावी' ही शिफारस ..................... मध्ये केलेली आहे.

(A) राममूर्ती समिती

(B) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (1986)

(C) राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा-2005

(D) राष्ट्रीय अध्यापक शिक्षण अभ्यासक्रम आराखडा-2009

75. जेंव्हा फ्लँडर्सच्या निरीक्षण आव्यूहामधील (1, 1) (2, 2) .......................... (10, 10) या चौकटीमधे खुणांची संख्या जास्त आढळते, तेंव्हा ............................... .

(A) शिक्षकाची वर्गात सातत्याने कृती चालू आहे

(B) विद्यार्थ्यांची वर्गात सातत्याने कृती चालू आहे

(C) वर्गात शांतता आहे

(D) वर्गात गोंधळ चालू आहे

**ROUGH WORK**